प्रेस नोट दिनांक :— ०४/०७/२०२३

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | श्री.सत्यवान रामचंद्र बांबोर्डे, वय ५३ वर्ष पद— कनिष्ठ लिपीक,नेमणुक — हौसाबाई आठवले, माध्यमिक आश्रम शाळा, चिखली डोमगाव ता.नेर जि.यवतमाळ<br>सध्या प्रतिनियुक्ती — कार्यालय, प्रादेशीक उपसंचालक,इतर मागास बहुजन कल्याण विभाग समाज कल्याण अमरावती.<br>रा. महालक्ष्मी नगर, महालक्ष्मी गार्डन जवळ नेर ता.नेर जि. यवतमाळ. वर्ग — ३. |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ व ठिकाण | ०४/०७/२०२३ चे ११/४५ वा. ते १२/४५ वा. दरम्यान |
| ४ | मागणी केलेली रक्कम | १२,०००/— रूपये. |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | तडजोडीअंती पहिला टप्पा १०,०००/— रूपये. |
| ६ | घटनास्थळ | प्रादेशिक उपसंचालक,इतर मागास बहुजन कल्याण विभाग, समाज कल्याण विभाग कार्यालय अमरावती. |

यातील तक्रारदार यांनी दिनांक ०३/०७/२०२३ रोजी तक्रार दिली की, त्यांची पत्नी सौ मिना हया समाज कल्याण विभागाअंर्तगत चालविण्यात येणा—या श्री.गोविंद गुरूकुल आश्रम शाळा,रिध्दपुर ता. मोर्शी जि.अमरावती या संस्थेमधुन १ जुलै २०२२ रोजी अधिक्षक या पदावरून सेवानिवृत्त झालेली आहे. त्यांच्या पत्नी सेवानिवृत्त झाल्यानंतर मिळणारे लाभ जसे जि.पी.एफ. रू.१६,४९,५३२/— मिळण्यासाठी दि.२०/१०/२०२२ रोजी पत्नीच्या नावाने अर्ज केला होता. सदर बिल मंजुर न झाल्याने त्याचा पाठपुरावा करण्यासाठी ते समाजकल्याण विभाग कार्यालयातील यातील आलोसे श्री.बांबोर्डे यांना बिलाबाबत विचारणा केली असता त्यांनी तक्रारदार यांच्या पत्नीच्या नावे असलेल्या जि.पी.एफ. चे रू. १६,४९,५३२/— मिळवुन देण्याकरीता आलोसे श्री.बांबोर्डे यांनी एकुन १२,०००/—हजार रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत लेखी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दि. ०३/०७/२०२३ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान आलोसे श्री.बांबोर्डे यांनी तक्रारदार यांच्या पत्नीच्या नावे असलेल्या जि.पी.एफ. चे रू. १६४९५३२/— मिळवुन देण्याकरीता तडजोडीअंती पहिला टप्पा १०,०००/— रूपये व बिल मंजुर झाल्यावर २,०००/— असे एकूण १२,०००/— रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

वरून आज दि.०४/०७/२०२३ रोजी आयोजित सापळा कार्यवाही दरम्यान श्री.सत्यवान रामचंद्र बांबोर्डे, वय ५३ वर्ष पद— कनिष्ठ लिपीक, कार्यालय, प्रादेशीक उपसंचालक,इतर मागास बहुजन कल्याण विभाग समाज कल्याण अमरावती यांनी तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम रूपये १०,०००/— पंचासमक्ष स्विकारल्याने आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेविरुध्द गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.शिवलाल भगत, पोलीस उप अधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांचे **मार्गदर्शनाखाली पो.नि. केतन मांजरे, पोहेकॉ. विनोद धुळे, पो.ना. युवराज राठोड, राहूल वंजारी, नितेश राठोड, पो.कॉ. वैभव जायले, चालक पो.उप.नि.सतीश किटुकले, यांनी पार पाडली.**

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क: अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती.
ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५,२६६४९०२
टोल फ्रि नंबर — १०६४

(केतन मांजरे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती
मो.नं. ९०२१३४१९६०.